**<u>स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)</u>**

**शहरातील प्रक्रिया न करता साठविलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या बायो मायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेचा अभ्यास करून, त्याबाबतचे धोरण तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्वमअ-२०१७/प्र. क्र.८०/नवि-३४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
४ था मजला, मंत्रालय, मुंबई
दिनांक: २७ ऑक्टोबर, २०१७.

**<u>पहा :</u>**

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे, २०१५.

**<u>प्रस्तावना:</u>**

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” च्या धर्तीवर संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” ची अंमलबजावणी मिशन मोड मध्ये सुरू आहे. या अभियांनांतर्गत शहरे “हागणदारी मुक्त” करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत “स्वच्छ” करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील शहरे घनकचरा व्यवस्थापनांतर्गत “स्वच्छ” करण्याकरिता, राज्यातील सर्व शहरांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरु आहे. आतापर्यंत राज्यातील ८१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात आले असून, त्यांची अंमलबजावणी सुरु आहे. राज्यातील उर्वरित सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल डिसेंबर, २०१७ अखेर तयार करून, त्यास मंजुरी देण्याचे नियोजित आहे.

३. राज्यातील बहुतांश नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी अनेक वर्षापासून, संबंधित शहरातील घनकचरा प्रक्रिया न करता मोकळ्या जमिनीवर अथवा नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आरक्षित केलेल्या भूखंडावर मोठ्या प्रमाणावर टाकलेला आहे. त्यामुळे अशा ठिकाणी कचऱ्याचे प्रचंड ढीग तयार झाले आहेत. यामध्ये ओला व सुका कचरा, प्लास्टिक, कागद, धातू, इ. सर्वच प्रकारच्या कचऱ्याचा समावेश आहे.

४. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालात, अशा प्रकारे अनेक वर्षापासून साठविलेल्या कचऱ्यावर बायो मायनिंग (Bio-Mining) या शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याचा समावेश करण्यात आला आहे. राज्यात प्रथमच अनेक वर्षापासून साठविलेल्या कचऱ्यावर बायो मायनिंग (Bio-Mining) या शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील शहरात प्रक्रिया न करता साठविलेल्या घनकचऱ्यावर बायो मायनिंग (Bio-Mining) या शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याच्या अनुषंगाने बायो मायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेचा अभ्यास करून, याबाबतचे धोरण तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय:</u>

राज्यातील शहरात प्रक्रिया न करता साठविलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या बायो मायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेचा अभ्यास करून, त्याबाबतचे धोरण तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सुभाष भुजबळ, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - | सदस्य |
| २) | श्री. रवींद्र ठाकूर, उप अभियंता (सीपीडीएम),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - | सदस्य |
| ३) | श्री. उदय टेकाळे, राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | - | सदस्य |
| ४) | श्री. प्रमोद पाटील, सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई | - | सदस्य |
| ५) | श्री. अभिजित बापट, मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद | - | सदस्य |
| ६) | श्री. रामदास कोकरे, मुख्याधिकारी, वेंगुर्ला नगरपरिषद | - | सदस्य |

२. **समितीची कार्यकक्षा :**

- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्यात आलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी निवडक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवड करून, त्या शहरातील पूर्वीपासून साठविलेल्या घनकचऱ्यावर बायो-मायनिंग (Bio-Mining) पद्धतीने करण्यात येणाऱ्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.

- राज्यातील शहरात साठविलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या बायो-मायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेवर लक्ष ठेवणे.
- घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या बायो-मायनिंग नंतर घनकचऱ्याच्या जुन्या भरावभूमीपैकी किमान ८०% जमीन पुनर्प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे.
- राज्यातील शहरात साठविलेल्या घनकचऱ्यावर बायो-मायनिंग (Bio-Mining) ही प्रक्रिया करताना येणाऱ्या अनुभवांची नोंद घेऊन, त्याचा सखोल अभ्यास करणे.
- राज्यातील शहरात साठविलेल्या घनकचऱ्यावर करण्यात येणाऱ्या बायो-मायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेचा सखोल अभ्यास करून, राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बायो-मायनिंग (Bio-Mining) प्रक्रिया राबविण्यासाठी राज्यस्तरीय धोरणाचा प्रस्ताव शासनास सादर करणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७१६५९२९०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.10.27 16:47:24 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
७. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
८. जिल्हाधिकारी, सर्व
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).
११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१२. निवडनस्ती, नवि-३४.